महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

दूरध्वनी क्र.०२२-२४९२७६३१.
इ-मेल- dmauidssmt९@gmail.com
संकेतस्थळ- https://mahadma.maharashtra.gov.in

सातवा मजला, बेलापुर भवन,सेक्टर-११,
सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई - ४००६१४.
कार्यासन क्र.०७.

क्र.नपप्रसं/ प्रयोगशाळा नामिकासुची /का.७/ 424

दिनांक : 29 JUN 2026

# आदेश

**विषय:- नगरविकास विभागामार्फत सुरु असलेल्या विविध विकास कामाच्या बांधकामासाठी आवश्यक साहित्य तपासणीसाठी प्रयोगशाळांची नामिका सूची (Empanelment).**

**संदर्भ:-** १. कक्ष अधिकारी नगर विकास -33 यांचे पत्र जावक क्रमांक संकीर्ण - 2025/ प्र. क्र. 231 / नवी-33 दिनांक 18/9/2025.

२. ई- निविदा सूचना क्र ११ ( Tender ID 2026_DMA-1277122-1) दि. १८.०२.२०२६ रोजी प्रसिद्ध.

वरील संदर्भ क्र. १ चे पत्राद्वारे नगरविकास विभागा मार्फत सुरु असलेल्या विविध विकास कामांच्या बांधकामासाठी आवश्यक साहित्य तपासणीसाठी प्रयोगशाळा प्रयोगशाळांची नामिकासुची तयार करण्याची संचालनालयाने आवश्यक कार्यवाही करण्यास कळविले आहे. त्यानुसार संचालनालयाने याकामी आवश्यक निविदा प्रक्रिया करून एकुण २० प्रयोगशाळा यांना नामिकासुची वर घेण्यास मान्यता दिलेली आहे.

या २० पैकी मे. स्ट्रोगटेक इंजिनिअरिंग सर्विसेस अंड रिसर्च इंडिया प्रा. लि. (**Strong tech engineering services and research india private limited**) यांची नेमणूक कोल्हापूर जिल्ह्यासाठी करण्यात येत आहे.त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| LAB Name and Address | NABL Certificate Number and validity | Contact Person Name/ Contact No./ Mail ID | District |
|---|---|---|---|
| **Strong tech engineering services and research india private limited**<br><br>Revision survey no. 96/2/a/3/6, paiki area h.o.02.92, jaysingpur, maharashtra, india 416101 | TC-16786<br>17-09-2025 to 16-09-2029 | RAJARAM PUJARI<br>9890059884<br>strongtech.jaysingpur@gmail.com | KOLHAPUR |

संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर

**प्रयोगशाळा नामिकासुचीच्या अटी व शर्ती:-**

१. प्रयोगशाळेकडे असलेल्या NABL Accreditation च्या वैध कालावधी व या आदेशाच्या पासून तीन (०३) वर्ष यापैकी जो कालावधी प्रथम समाप्त होईल त्या कालावधी नामिकासुची (Empanelment) वर घेण्यात येत आहे.
२. नामिकासुची (Empanelment) कालावधी दरम्यान NABL मान्यता कालबाह्य, निलंबित, रद्द किंवा कमी झाल्यास नियुक्ती केलेल्या प्राधिकरणास संबंधित एजेन्सीने तात्काळ लेखी स्वरूपात कळविणे आवश्यक राहील.
३. कोणत्याही टप्प्यावर NABL मान्यता अवैध आढळल्यास संबंधित प्रयोगशाळेस नामिकासुची (Empanelment) तून रद्द किंवा निलंबित करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकरणास असेल.
४. प्रयोगशाळेला फक्त NABL Scope मध्ये नमूद असलेल्या चाचण्या करण्यास परवानगी राहील.
५. NABL मान्यता बाहेरील कोणतीही चाचणी या पॅनलमेंट अंतर्गत स्वीकारली जाणार नाही. संबंधित प्राधिकरणास कोणत्याही वेळी प्रयोगशाळेच्या मान्यताप्राप्त Scope ची पडताळणी करण्याचा अधिकार राहील.
६. NABL Scope मध्ये कोणताही बदल, वाढ, कपात किंवा निलंबन झाल्यास प्रयोगशाळेने तत्काळ नियुक्ती केलेल्या प्राधिकरणास माहिती देणे आवश्यक राहील.
७. साहित्य तपासणी ही प्रथमता जिल्ह्यात नामिकासुची (Empanelment) वर उपलब्ध प्रयोगशाळेतूनच करण्यात येईल. जिल्ह्यात नामिकासुची (Empanelment) वर उपलब्ध नसल्यास शेजारील जिल्ह्यात नामिकासुची (Empanelment) वर उपलब्ध प्रयोगशाळेतून साहित्य तपासणी करता येईल. परंतु साहित्य तपासणी ही विभागाबाहेर करता येणार नाही. विभागाबाहेरील प्रयोगशाळेतून साहित्य तपासणी करावयाची आवश्यकता असल्यास त्याबाबत संचालनालयाची पुर्व परवानगी आवश्यक राहील.
८. NABL मधील दिलेल्या स्वरूपात (Format) मध्ये अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. अहवालावर NABL चिन्ह/लोगो, मान्यता क्रमांक, चाचणी पद्धती, अधिकृत स्वाक्षरी व बार कोड असणे आवश्यक राहील.
९. घेतलेल्या चाचणीसाठी स्वीकृती मर्यादेचे मूल्य (Acceptance limit) संबंधित आयएस कोडनुसार या चाचणी अहवालात दर्शविले जाईल. तपासणी अहवालाचे एक प्रत (hard copy) व मेल द्वारे (soft copy) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस देणे बंधनकारक राहील. ई-मेल द्वारे प्राप्त अहवाल ग्राह्य धरण्यात येईल. बिल अदा करते वेळेस चाचणीची hard copy व soft copy (ई-मेल) तपासूनच बिल अदा करण्याचे जबाबदारी मुख्याधिकारी यांची राहील.
१०. NABL प्रमाणपत्रावरील पत्ता हाच साहित्य तपासणीसाठी ग्राह्य धरला जाईल या व्यतिरिक्त इतर ठिकाणी प्रयोगशाळेच्या इतर शाखा असल्यास त्या ठिकाणचे अहवाल ग्राह्य धरले जाणार नाही.
११. NABL नियमांचे पालन न करणारे किंवा मान्यताबाहेरील अहवाल स्वीकारले जाणार नाहीत. चुकीचे, फेरफार केलेले किंवा नियमबाह्य अहवाल आढळल्यास संबंधित अहवाल नामंजूर करण्यात येतील तसेच पॅनलमेंट रद्द करण्यात येईल.
१२. प्रयोगशाळेने सर्व चाचण्यांचे मूळ नोंदी, डेटा व संबंधित कागदपत्रे तीन(०३) वर्षासाठी जतन करून ठेवणे आवश्यक राहील व मागणी केल्यास तपासणीसाठी सादर करणे बंधनकारक राहील.

संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय

१३. प्रयोगशाळेच्या मालकाने नगरविकास विभागाच्या कामांच्या नमुन्यांच्या चाचणीस सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. या संदर्भात बिघाड आढळल्यास, प्रयोगशाळेची नोंदणी रद्द केली जाईल.

१४. साहित्य तपासणीचा(Testing) खर्च संबधीत योजनेचे कंत्राटदार स्वतः करतील.

१५. बांधकाम साहित्याचे तपासणी अहवाल साहित्य प्राप्त आल्यापासून विहीत मुदतीत संबधीत कंत्राटदार/उपविभाग यांना सादर करणे अनिवार्य राहील.

१६. शासकीय सुटटीच्या दिवशीही साहित्य / क्यूब स्विकारण्याची व्यवस्था असणे अनिवार्य राहील व शासनाने ठरवून दिलेल्या दरा नुसार आपणास बांधकाम साहित्य चाचण्याची फी आकारणी करावी लागेल.

१७. प्रयोगशाळेतील/कार्यस्थळावरील आक्षेपीत चाचणी अहवाल करीता / संकल्पना करीता संचालनालय यांचे व्दारे सुचविल्यास सदर बाबत शक्यतो विनामूल्य/शासकीय दरात पुनः चाचणी अहवाल उपलब्ध करून दयावा लागेल.

१८. नोंदणीच्या नूतनीकरणासाठी वैध नोंदणीची मुदत संपण्याच्या ६ महिन्यांपूर्वी अर्ज करावा लागेल.

**मा. आयुक्त तथा संचालक यांच्या मान्यतेने.**

(संजय काकडे)
सह आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रत:- १) मे. स्ट्रोगटेक इंजिनिअरिंग सर्विसेस अंड रिसर्च इंडिया प्रा. लि.
**(Strong tech engineering services and research india private limited)**

**माहितीस्तव:-** २) कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, नवि-३३
३) विभागीय सह आयुक्त, (सर्व)
४) जिल्हा सह आयुक्त, (सर्व)
५) मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगर पंचायती (सर्व) - राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था यांना नामिकासुची यादीत दर्शविलेल्या प्रयोगशाळा संस्थेकडून साहित्य तपासून घेणे बंधनकारक राहील. तसेच यापूर्वी शासन मान्य शासकीय प्रयोगशाळा येथून साहित्य तपासून घेणेची व्यवस्था यामध्ये कोणताही बदल नाही.